जिल्हा परिषद, रायगड

## ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
## (निविदा सुचना नं. २७ सन २०२६-२७)

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडील खालील कामांची निविदा योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यांत येत आहेत. तरी खालील निविदाबाबतची सर्व माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी (जीएसटी सह) | वर्गवारी | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|
| | **पहिले बोलावणे** | | | | | |
| १ | छत्रपती शिवाजी महाराज यांचे ३५३ वा राज्यभिषेक सोहळयाकरीता दि.०६/०६/२०२६ व दि. २६/०६/२०२६ दरम्यान किल्ले रायगडावर पाणी बॉटल पुरविणे ता.महाड जि.रायगड | १७८४६७९/- | १७८४७/- | ११८०/- | वर्ग- ०५ अ त्यावरील | जि. प. रायगड कडील वैध वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार खुला |

- **वरील कामाची संपुर्ण माहिती शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १८/०५/२०२६ रोजी १७.०० वाजलेपासून ते दि.२२/०५/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यत उपलब्ध आहे, यादरम्यान निविदा भरता व डाऊनलोड करता येतील.**

- **निविदेचे वेळापत्रक -**

| तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| संकेतस्थळावरुन ई- निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | दि. १८/०५/२०२६ पासून | १७.०० |
| | दि. २२/०५/२०२६ पर्यत | १७.०० |
| ई- निविदा सादर करणेचा अंतिम कालावधी | दि. २२/०५/२०२६ पर्यत | १७.०० |
| ई- निविदा उघडणेची वेळ व तारिख | दि. २५/०५/२०२६ नंतर (कार्यालयीन सोयीनुसार) | १७.०० |
| ई- निविदा उघडणेसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप- अलिबाग | |
| | मा. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग राजिप | |
| | मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, राजिप,अलिबाग | |

- निविदेच्या अटी व शर्ती-

१. जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचेकडून सदर कामांना प्रशासकीय मंजुरी मिळण्याच्या अटीच्या अधीन राहून सदरच्या निविदा प्रसिध्द करणेत येत असून सदर निविदा कोणत्याही टप्यावर रदद करणेचेअधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांना असतील.

२. सदर पुरवठयाची संख्या शिवभक्ताच्या संख्येवर अवलंबुन असल्याने तातडीने सदर पुरवठयाची मागणी वाढीव होऊ शकते अशावेळी तसा वाढीव पुरवठा करणे निविदाधारकावर बंधनकारक असेल.

३. सदर पाणी बाटल्यांचा पुरवठा पाचाड येथील ग्रामपंचायत कार्यालयात करणेचा असून सदर पुरवठ्यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती महाड जि. रायगड यांचे नियंत्रण राहील.

४. वरील कामाची निविदा फी (Tender Fee) व इसारा रक्कम (EMD) ही शासनाचे वरील www. Mahatenders.gov.in या संकेतस्थळावर आपले लॉगीन दवारे भरणेची सुविधेनुसार भरणा करावी व त्याची PDF प्रत तांत्रिक लिफाफयात अपलोड करावी.

५. जि. प. रायगड यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार खुला नोंदणी प्रमाणपत्राची मूळप्रत (Registration Copy) निविदेसोबत अपलोड करावी लागेल.

६. निविदाधारकाने पॅनकार्ड व आधारकार्ड यांची स्कॅनद्रत तांत्रिक लिफाफयात अपलोड करावी.

७. GST CERTIFICATE ORIGINAL COPY (स्कॅन) प्रत निविदेसोबत सादर करावी.

८. निविदाधारकाने सदर योजनेच्या अंमलबजावणीचे कामाचे ठिकाणी स्वतः जावून नैसर्गिक परिस्थीतीचा आढावा घेणे गरजेचे आहे. व तदनंतर सदरील काम करणेची स्वतः ची खात्री पटल्यानंतरच निविदा सादर करावी.

९. निविदा प्रपत्रातील Declaration of the contractor विहीत नमुन्यातील कंत्राटदाराचे रु. ५००/- च्या बॉड (Bond) पेपरवर स्कॅनप्रत अपलोड करावी.

१०. सदरील कामाचा आर्थिक लिफाफा उघडलेनंतर १ निविदाधारकांने ०5 दिवासात विहित नमुन्यात करारनामा करुन घेणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केलेस संबंधित १ निविदाधारकावर कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी

११. वित्त विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. GST१०१७/प्र.क्र.८१/कराधान१ मंत्रालय, मुंबई दि. १९/०८/२०१७मधील मुददा क्र. १ नुसार निविदा सादर करताना दि. ०१/०७/२०१७ नंतर लागू झालेल्या GST कराच्या बोज्याचा विचार करुनच कंत्राटदराने निविदा सादर करणे अनिवार्य आहे.

१२. बांधकाम व इतर कामाचे मजुर (रोजगार नियमन व सेवेच्या शर्ती) अधिनियम १९९६ व त्याखालील बनविण्यात आलेल्या विविध नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील. इमारत व इतर बांधकाम मजुराचे कल्याण सेस नियम १९६८ मधील नियमांचे पालन करावे.

१३. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. बीजीडी-२०१६/प्र.क्र./इमा-२ मंत्रालय मुंबई यांचे दि. १२/०२/२०१६ मधील मार्गदर्शक सुचनेनुसार प्राप्त निम्नतम निविदेच्या देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १% ते १०% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या १% एवढ्या रकमेच्या घनाकर्ष (Demand Draft) (मुख्य लेखा व वित्ताधिकारी, राजिप) यांचे नावे परफॉर्मन्स सिक्युरीटी म्हणून या कार्यालयात सादर करावा लागेल. (उदा १% ते १०% कमी दर ११% रक्कम)

१४. ठेकेदाराने कामावर आलेल्या मजुरांची यादी ई-निविदेसोबत जोडणेत यावी तसेच कामावर आलेल्या सर्व मजुरांचा काम सुरु करण्यापुर्वी विमा काढण्यात यावा. अन्यथा प्रत्यक्ष काम करतेवेळी मजुर कर्मचारी अनावधानाने अपघात व दुखापत, मृत्यु झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल. त्यासाठी जिल्हा परिषद मार्फत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

१५. या कामासाठी आलेल्या निविदापैकी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रदद करणेचे अधिकार निविदा समितीने राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा सादर करणा-या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला (निविदा) रदद केल्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.

१६. शासन निर्णय दि. १७/०३/२०१० नुसार १००% घरगुती नळजोडणी अनिवार्य राहील.

१७. या अनुषंगाने लागू असणारे शासन निर्णय, परिपत्रक, मार्गदर्शक सुचना या वेळोवेळी होणा-या सुधारणांसह ठेकेदारावर बंधनकारक राहतील.

१८. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीएटी२०१८/प्र.क्र.१२७/इमार मंत्रालय मुंबई दि. २८/११/२०१८ नुसार निविदेसोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास भारतीय दंड विधान संहितेच्या कलम अंतर्गत संबंधित कंत्राटदाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणेत येईल याची सर्वस्वी जबाबदारी ऑनलाईन खोटी कागदपत्रे सादर करणारे कंत्राटदार यांची असेल याची नोंद घ्यावी.

१९. निधी उपलब्धतेनुसार व वितरणानुसार देयक अदा केले जाईल याची नोंद घ्यावी.

२०. ऑनलाईन निविदा सादर केल्यानंतर, निविदाधारकास लेखी पत्र देऊन निविदेतुन माघार घेता येणार नाही. निविदाधारकाने असे केल्याचे दिसून आलेस संबंधित निविदाधारकाचे नोंदणी प्रमाणपत्र काळ्या यादीत समाविष्ट करणे तसेच त्याची सुरक्षा अनामत/इसारा रक्कम जप्त करणेची कार्यवाही करणेत येईल याची निविदाधारकाने गंभीर नोंद घ्यावी.

२१. वर नमूद निविदा कोणत्याही क्षणी रदद करणेचे तसेच मंजुर / नामंजुरीचे अधिकार निविदा समितीने राखून ठेवले असून ते निविदाधारकावर बंधनकारक राहतील व याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

२२. वरील सर्व अटी व शर्ती निविदाधारकास मान्य असल्याने त्याने निविदा सादर केली आहे असे गृहीत धरले जाईल.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| कार्यकारी अभियंता | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, राजिप | रायगड जिल्हा परिषद अलिबाग | रायगड जिल्हा परिषद अलिबाग |

Signature Not Verified
Digitally signed by MOHAN NAGNATH SARWADE
Date: 2026.05.18 19:33:24 IST
Location: Maharashtra-MH